# बार्शी शहर : एक चिकित्सक अभ्यास

प्रा. डॉ. बळीराम हणुमंत जाधव

## प्रस्तावना :

गौरवशाली ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर हा एक खूप महत्वाचा जिल्हा आहे. पंढरीचा विठोबाराया, बार्शीचा भगवंत, सोलापूरचा सिध्देश्वर, अक्कलकोटचे स्वामी समर्थ, वडवळचा नागनाथ ही या जिल्ह्यातील काही प्रमुख देवस्थाने आहेत.[१]

सोलापूर जिल्ह्याला प्राचीन इतिहास लाभलेला आहे. इ. स. पू. ९० ते इ. स. ३०० या काळात सोलापूरच्या प्रदेशावर सातकर्णी सत्ताधिशांचे राज्य होते. पुढे इ. स. ५५० ते इ. स ७६० या काळामध्ये चालुक्याचे, इ. स. ९७३ पर्यंत राष्ट्रकुटांचे, त्यानंतर १३ व्या शतकापर्यंत देवगिरीच्या यादवांचे राज्य होते. या यादवांचा पुढे मुस्लिमांनी पाडाव केल्यानंतर हा प्रदेश इ. स १३४७ मध्ये हसण गंगू याने स्थापन केलेल्या बहामणी सत्तेच्या अधिपत्त्याखाली आला. प्रशासनाच्या सोयीसाठी त्याचे ११ विभाग पाडण्यात आले. कालांतराने सत्ता संघर्षातून या विभागांपैकी बार्शी, माढा, परांडा व करमाळा हे प्रदेश ' ख्वाजा जहानला ' च्या अधिपत्त्याखाली अनेक वर्ष राहिले. नंतर हा प्रदेश निजामशहाच्या अधिपत्त्याखाली येऊन, त्याने हा प्रदेश त्यांच्याकडे आलेल्या निंबाळकरांना दिला.[२] १९ फेब्रूवारी १८१८ रोजी जनरल स्मिथ याने पेशव्यावर मिळविलेल्या विजयाने सोलापूर जिल्हा ब्रिटिशांच्या ताब्यात गेला.[३]

इ. स. १८१८ मध्ये पेशवाईच्या अस्तानंतर तत्कालीन सोलापूरच्या प्रदेशातील २६१ गावे ब्रिटिशांच्या अधिपत्त्याखाली आली. यातील १२३ गावे बार्शी तालुक्यातील होती. बार्शी व सोलापूर हे विभाग एकापेक्षा अधिकवेळा पुण्यातून अहमदनगरमध्ये व अहमदनगरमधून पुण्यामध्ये सामाविष्ट झाले होते. इ. स. १८३८ मध्ये सोलापूर, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, इंडी, हिप्परगी आणि मुद्देबिहाळ यांचा मिळून सोलापूर जिल्हा तयार झाला. इ. स. १८६४ मध्ये तो पुन्हा विखुरला.[४] इ. स. १९५६ च्या राज्य पुर्नरचनेनुसार सोलापूर जिल्हा तत्कालीन मुंबई राज्यामध्ये होता. इ. स. १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर सोलापूर हा महाराष्ट्रातील एक जिल्हा बनला.[५] अशा या सोलापूर जिल्ह्यामधील बार्शी हा एक आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिकदृष्ट्या समृध्दशाली तालुका आहे.

इ. स. १८६९ पूर्वी सोलापूर विभागातील एक महत्वाचा असणारा बार्शी हा उपविभाग वारंवार एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्याला जोडला जायचा. इ. स. १८१९-२० मध्ये बार्शी उपविभाग अहमदनगर जिल्ह्यात होता. इ. स. १८२०-२२ च्या दरम्यान तो पुन्हा सोलापूरला, तर इ. स. १८२६ मध्ये तो पुन्हा अहमदनगर जिल्ह्यास जोडण्यात आला. इ. स. १८३१ मध्ये बार्शी उपविभाग पुण्याला जोडण्यात आला. तर इ. स १८३८ मध्ये तो पुन्हा सोलापूरला जोडण्यात आला. तो आजतागायत कायम आहे.[६] अशा या बार्शी तालुक्यामध्ये बार्शी हे एकमेव शहर आहे.

## ➢ बार्शी शहर :-

' बार्शी ' हे शहर आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व राजकीयदृष्टया खूप महत्वाचे आहे. पंढरपूरला एकादशी धरून बार्शीला भगवंताचे दर्शन घेऊन द्वादशी सोडण्याची परंपरा आजतागायत चालू आहे. बार्शीचे मूळ नाव ' द्वादशीक्षेत्र ' असे होते. द्वादशी या संस्कृत शब्दास प्राकृत भाषेत ' बारस ' असा शब्द आहे. यावरून बारस-बारसापूर-बार्शी असे नाव तयार झाले.[७] येथेच विसोबा खेचर समाधिस्त झाले.[८]

इ. स. १६९१ मध्ये छत्रपती राजाराम महाराज यांनी नागोजी माने याला सरदेशमुखीसाठी जे मुलूख दिले होते त्यामध्ये बार्शी हे ठिकाण होते. इ. स. १७६४ बार्शी परगण्याची जहागिरी मुधोजी नाईक निंबाळकर आणि कृष्णाजी नाईक निंबाळकर यांच्याकडे चालत आलेली होती. राक्षसभूवनची लढाई मराठ्यांच्या इतिहासामध्ये एक महत्वाची लढाई मानली जाते. यावेळी माधवराव पेशवे निजामाकडे जाताना वाटेत मोगलांचा मुलूख नासधूस करत जात होते. त्यांनी बार्शी परगण्यांची खूप खराबी केली होती.[९]

## ➢ पौराणिक, अध्यात्मिक :-

राजा अंबरीष हा एक श्रेष्ठ भक्त होता. कामंदकीय नितीसार या ग्रंथात भगवान परशुरामाबरोबर राजा अंबरीषचा अत्यंत गौरवपूर्ण उल्लेख आलेला आहे. श्रीमद्‌भागवत पुराणाच्या नवव्या स्कंधातील चवथ्या अध्यायामध्ये राजा अंबरीषाचे साधन द्वादशीचे व्रत, दुर्वास ऋषींनी त्याचे व्रतभंग करण्याचा केलेला निष्फळ प्रयत्न याची पौराणीक कथा आलेली आहे.[१०] विष्णूची भगवंत रूपातील केवळ दोनच मंदिरे भारतात आहेत. यापैकी एक बार्शी येथे आहे तर दुसरे वाराणशी येथे आहे.[११]

बार्शीमध्ये भगवंताचे पुरातन मंदिर असून, ते इ. स. १२४५ च्या सूमारास हेमाडपंती पध्दतीने बांधलेले आहे. भगवंताची मूर्ती गंडकी शिळेच्या गुळगुळीत काळया पाषाणाची आहे. गाभाऱ्यासमोरील नक्षीदार खांबाचा मंडप दोनशे वर्षापूर्वीचा असावा असे देणगीदाराच्या उल्लेखवरून समजते. मंदिराच्या उत्तरेकडील ओवरीत बार्शीचे नामदेवकालीन संत श्री जोगापरमानंद याची समाधी आहे. शिखांच्या पवित्र ग्रंथ गुरूग्रथसाहेब यामध्ये जोगा परमानंद यांच्या काही ओव्या आहेत.

त्यामुळे अनेक शिख यात्रेकरू भगवंत मंदिरातील जोगा परमानंद यांच्या समाधिला दरवर्षी आवर्जून भेट देतात. संत जनाबाईच्या एका अभंगानुसार विसोबा खेचरासारखे श्रेष्ठ संत देखील जोगा परमानंदाकडे आकर्षीत झाले होते. संत नामदेवाचे गुरू विसोबा खेचर यांची समाधी बार्शी येथील उत्तरेश्वर मंदिराच्या पाठीमागे आहे. या गुरू-शिष्याची प्रथम भेट बार्शी येथील मल्लिकार्जुन मंदिरामध्ये झाली होती. " द्वादशीचे गावी झाला उपदेश " असे नामदेवाच्या एका अभंगामध्ये म्हटलेले आहे.[१२] मराठवाड्यातून पंढरपूरला जाणाऱ्या अनेक दिंड्या बार्शीतूनच जातात. भगवंत ट्रस्ट मार्फत त्यांची योग्य ती सोय केली जाते.[१३]

सोलापूरचे कवी राम जोशी यांनी भगवंताचा महिमा सांगणारी लावणी रचली आहे. अशा या भगवंताच्या मंदिरास इ. स. १७५९-६० मध्ये नानासाहेब पेशवे यांनी तर, इ. स. १८७४ मध्ये इंग्रज सरकारने मंदिराच्या खर्चासाठी सनद दिली. तसेच अहिल्याबाई होळकर यांनी या मंदिरास देणगी दिली होती.[१४]

हिंदू धर्मियांच्या या पवित्र मंदिराची माहीती मुघल सम्राट औरंगजेब याला देखिल होती. इ. स १६९५ मध्ये ब्रह्मपूरी येथे मुक्कामी असताना औरंगजेबाने आसदखानास हे मंदिर पाडण्याचा हुकूम दिला होता.[१५]

## ➢ सांस्कृतिक महत्व :

शाहिर अमर शेखचे नाव घेताच लोकांना संयुक्त महाराष्ट्राचा लढा आठवतो. शाहिर अमर शेख हे मुळचे बार्शीचे होते. त्यांचे मूळ नाव मेहबूब पटेल होते. बार्शी शहरातील मंगळवार पेठेमध्ये त्यांचे घर आहे. इ. स. १९४२ च्या चळवळीमध्ये बार्शीचा हा मेहबुब पटेल भूमिगत होऊन शाहिर अमर शेख बनला. शाहिर आण्णाभाऊ साठे, शाहीर गव्हाणकर, मधू व बापू यांनी स्थापन केलेले लाल बावटा कला पथक आण्णाची लेखणी व अमर शेखांचा आवाज यामुळे देशभर लोकप्रिय झाले. याची रशियापर्यंत प्रसिध्दी गेली होती.[१६]

इ. स. १८६३ मध्ये बार्शीचे तत्कालिन जज्ज गोविंद जिवाजी व रामचंद्र मोरेश्वर साने यांनी बार्शी येथे सार्वजनिक वाचनालयाची स्थापना केली. बार्शीचा वकीलवर्ग पुढारलेला होता. इ. स. १९२४ मध्ये गोविंद कृष्ण टिळक व बाबाराव काळे यांनी पुढाकार घेऊन खास ब्राह्मणसाठी समर्थ व्यायामशाळेची स्थापना केली. इ. स. १९३४-३५ मध्ये भगिनी समाज स्थापन झाला. यातूनच पुढे महिला समाज निघाला. इ. स. १९३४ मध्ये स्थापन झालेल्या हरीजन सेवक संघाने गांधी छात्रालय स्थापन करून हरीजन उध्दाराचे मोलाचे कार्य केले. इ. स. १९३५-३६ मध्ये बार्शीत ब्राह्मण अनाथ विद्यार्थीगृह सुरू झाले. बार्शी येथे इ. स. १९०२ मध्ये प्रसिध्द पत्रकार श्रीपादराव टिकेकर यांचा जन्म झाला. इ .स. १९२० मध्ये इंडियन टेक्सटाईल जर्नल मध्ये लेख लिहून त्यांनी आपल्या पत्रकारीतेची सुरूवात केली. केसरी, क्रॉनिकल अशा वृत्तपत्रातून त्यांचे लेख प्रसिध्द झाले. इ. स. १९३० मध्ये ते केसरीचे प्रतिनिधी म्हणून अफगाणिस्थानला गेले होते. महाराष्ट्रातील पहिला मुक्तपत्रकार जनक हा मान त्यांना मिळाला. त्यांच्यामुळेच लोकहितवादींची शतपत्रे मराठी वाचकांना उपलब्ध झाली.[१७]

बार्शीतील वेळापूरकर मठाचे मठाधिपती श्री. ष. बृ. १०८ गुरू मुक्तेश्वर शिवाचार्य वेळापूरकर महास्वामी यांना संपूर्णानंद संस्कृत विश्वविद्यालयाच्या दिक्षांत सोहळ्यामध्ये इ. स. १९८९ मध्ये विश्वविद्यालय सुवर्ण पदक, अन्नप्रसाद मुखर्जी सुवर्ण पदक व जगद्‌गुरू विश्वआराध्य सुवर्ण पदक अशा तीन सुवर्ण पदकासह ' शक्ती विशिष्ठाद्वैत वेदांतचार्य ' ही पदवी मिळाली.[१८] विक्रम वडतीले याने कुस्तीच्या माध्यमातून तर, प्रार्थना ठोंबरे हिने टेनिसच्या माध्यमातून बार्शी तालुक्याचे नाव जागतिक पातळीवर पोहचविले.[१९] बार्शी शहरामध्ये वीरशैव लिंगायत समाजाचे अनेक मठ आहेत. तेथील मठाचे मठाधिश जगत्‌गुरूच्या मार्गदर्शनाखाली विविध धार्मिक उपक्रम, संस्कृत पाठशाळा चालवितात. श्रीमद् जगत्‌गुरू पंचाचार्यापैकी जगत्‌गुरू श्री. प्रसन्न रेणुकाचार्य रंभापुरी महास्वामी बार्शीचे रहिवाशी आहेत, ही बार्शीच्या दृष्टीने अभिमानाची बाब आहे.[२०]

इ. स. १९५४ मध्ये परंडकर महाराज यांचा बार्शीतील भगवंत मैदानावर चार जगत्‌गुरूंच्या उपस्थितीमध्ये पट्टाभिषेक सोहळा मोठ्या दिमाखात संपन्न झाला होता. परंडकर महाराजांनी बार्शीच्या पाण्याचा प्रश्न चांदणी प्रकल्पाच्या माध्यमातून मार्गी लावण्यामध्ये मोठे योगदान दिले. त्यापूर्वीचे परंडकर मठाचे मठाधिश राचलिंग महाराजांनी जय शंकर मिल, पाठशाळा तसेच वीरशैव बोर्डींग यांच्या स्थापनेमध्ये अनन्यसाधारण योगदान दिले.[२१]

बार्शी शहरातील हे मठ वीरशैव समाजाचे असले तरी काही मठाचे अध्यक्ष मुस्लिम, ब्राह्मण, मराठा, खाटिक या जातीचे होते. या सर्व मठांनी सर्वधर्मसमभाव जोपासून बार्शीच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मौलिक योगदान दिले आहे. उदा -औंधकर मठाचे अध्यक्ष वकील अब्दुल गन्नी हे आहेत. या मठांच्या माध्यमातून सर्व उत्सव साजरे केले जातात. गणेशोत्सव फार मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. तसेच मोहरमही प्रत्येक मठातून साजरा केला जातो. प्रत्येक मठाच्या स्वतंत्र सवाऱ्या आहेत. यापैकी माणूरकर मठाच्या झेंडे सवारीला पहिला मान आहे.

पूर्वीपासून बार्शी शहराचे दोन विभाग होते. १) पेठकर २) कसबेकर. या दोन्ही विभागामध्ये वर्चस्वाच्या माध्यमातून नेहमी चुरस लागत असे. या दोन्ही विभागाच्या स्वतंत्र व्यायामशाळा होत्या. त्यापैकी घोडेगल्ली या तालमिचे संस्थापक बाबाय्या राचय्या हे होते. साधारणतः इ. स. १८५० पूर्वी त्यांनी या तालमिची उभारणी केली. बार्शी शहरातील बार्शी गोरक्षण मंडळाची स्थापना यांनीच केली. स्वतः जंगम असले तरी यांचे दैवत मौलाली हे होते. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे चिरंजिव आप्पय्या यांनी त्यांचा वारसा पुढे चालविला. त्यांनी एक वाघ सांभाळला होता. यांच्याच काळात बार्शीमध्ये अनेक नामवंत पैलवान झाले. कसबेकर व्यायामशाळा या तालमिचे संस्थापक व वस्ताद गंगारामभाई हे मुळचे बार्शी

जवळील परांडा येथील होते. या तालमिचे मल्ल नाना काळे ऑलंपिकवीर खाशाबा जाधव यांच्याबरोबर लढले होते. बार्शी शहरातील अबु ताशेवाले व सनईवादक चिंगा फकिरा हे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये प्रसिध्द होते. इ. स. १९३४ साली कोलंबिया कंपनीने चिंगा फकिरा याच्या सनईवादनाचे रेकॉर्डींग करून ते वितरीत केले होते. हैद्राबाद व ग्वाल्हेर येथील चिंगा फकिरा याच्या सनईवादनाचे कार्यक्रम खूप गाजले होते.

महाराष्ट्रामध्ये लावणी, तमाशासाठी बार्शी शहर विशेष प्रसिध्द होती. ज्यावेळी महाराष्ट्रामध्ये लावणीचा दोन आणे दर होता, त्यावेळी बार्शीमध्ये लावणीचा दर १ रूपया इतका होता. एखांदया लावणी सादर करणाऱ्या स्त्रिला बार्शीकरांनी काही दिले तर त्याचे महाराष्ट्रभर नाव होत असे. इ. स. १९२०-३० च्या दरम्यान पुण्याच्या गोदावरीबाईला लावणीच्या एका बैठकित २,००० रूपये मिळाले होते. यावरून बार्शी शहराची आर्थिक समृध्दी लक्षात येईल.[२२]

## ➢ शैक्षणिक वाटचाल

बार्शी तालुक्यातील प्राथमिक शिक्षणाचा श्रीगणेशा मुलांची मराठी शाळा नं १ ने झाला. या शाळेत पहिली पासून ते सातवी पर्यंत शिक्षणाची सोय होती. इ. स. १८३९ पासून या शाळेचा उल्लेख येतो. त्यावेळी शाळेच्या पटावर १४९ मुले होती. इ. स. १८६४ साली या शाळेचा कारभार बार्शी नगरपालिकेच्या ताब्यात आला. ही शाळा तालुक्याचा शैक्षणिक केंद्रबिंदू होती. या शाळेमार्फत तालुक्याच्या इतर शाळांचा कारभार पाहिला जात होता. या शाळेतून अनेक नामवंत विद्यार्थ्यांची जडण - घडण झाली.[२३] इ. स. १८६९ मध्ये सोलापूर जिल्ह्यामध्ये सर्वप्रथम बार्शी येथे मुलींची शाळा उघडण्यात आली. पुढील १० वर्षात शहरातील शाळांची संख्या ३ होऊन, या शाळेत १११ विद्यार्थी शिकत होते. इ. स. १८८२-८३ मध्ये ही संख्या ४ वर जाऊन या शाळेतील विद्यार्थीसंख्या १७६ झाली. याच कालावधित बार्शी शहरामध्ये ४ सरकारी शाळा होत्या व या शाळेत ३२३ विद्यार्थी होते.[२४]

कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांनी गोरगरीब मुलांना शिक्षण मिळावे म्हणून ५ ऑगस्ट १९३४ रोजी श्री शिवाजी मराठा बोर्डिंग सुरू केले. इ. स. १९४७ मध्ये मामांनी या बोर्डींगचे " श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ " यामध्ये रूपांतर करून बार्शी तालुका व उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये शिक्षण प्रसार करण्याचे महान कार्य केले.[२५]

लोकमान्य टिळकांचा प्रभाव असलेले भगवंत पंढरीनाथ ऊर्फ काकासाहेब सुलाखे यांनी बार्शी येथे ' न्यू इंग्लीश स्कूलची ' स्थापना केली. याचेच पुढे सुलाखे हायस्कूलमध्ये रूपांतर झाले. बार्शी तालुक्याच्या शैक्षणिक जडणघडणीमध्ये या हायस्कूलचे मोठे योगदान आहे. इ. स. १९५४ मध्ये भाऊसाहेब झाडबुके यांनी बार्शी येथे बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. शहरात एक महाविद्यालय सुरू केले. आपल्या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी बार्शी शहर व आसपासच्या परिसरातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची सोय केली.[२६]

## ➢ व्यापारी महत्व

पूर्वी निजाम व मोगल यांच्या सीमेवर व नंतर पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा यांच्या सीमेवर असलेल्या बार्शी शहराला संपन्न अशी व्यापारी पार्श्वभूमी लाभलेली आहे. यामुळे सोलापूर जिल्ह्यातील आर्थिक घडामोडीचे महत्वाचे केंद्र अशी बार्शी शहराची ओळख निर्माण झाली. या ठिकाणी होणारी आर्थिक उलाढाल लक्षवेधक आहे. 'बार्शी शहर' हे जिल्ह्यातील सर्वात महत्वाचे व्यापारी ठिकाण होते. निजामाच्या राज्यातील सर्व प्रकारचा माल बार्शी मार्गेच पश्चिमेकडे पाठविला जात असे. बालाघाटातील लातूर, गंगाखेड, मोमीनाबाद, नांदेड, पाथरी, हिंगोली आणि बीड या ठिकाणाहून मागवलेला माल व्यापाऱ्यांना बार्शीमार्गेच न्यावा लागत असे. बार्शी हे निजाम व मोगल यांच्या सीमेवरील ठिकाण असल्याने या ठिकाणी मालाची देवाण-घेवाण फार मोठ्या प्रमाणात होत असे. या ठिकाणी मुंबईचे व स्थानिक व्यापारी यांच्या शिवाय युरोपीय व्यापारी व्यापार करत होते.[२७]

इ. स. १७९५ मध्ये पेशवे आणि निजाम यांच्यात खर्ड्याची लढाई झाली. खर्ड्याकडे जाताना निजामाच्या सैन्याने बार्शी पेठ लुटली व या पेठेची खूप नासधूस केली. कसबे बार्शी येथील पेठ याकूदपूर वैराण आहे अशी नोंद आहे. यावरून पूर्वी बार्शीच्या पेठेला ' याकुदपूर ' म्हणत असावेत. दुष्काळामुळे बार्शीची पेठ वैराण झाली होती. तरी पुन्हा नवी पेठ वसविण्यासाठी भगवान शामराव यास माधवराव पेशवे यांनी इ. स. १७७७-७८ मध्ये हुकूम दिला होता. वाणी, उदमी यांना सात सालचा कौल दिला. पेठ वसाहतीसाठी जमीन दिली. रामशास्त्री प्रभुणे हे पेशव्यांचे न्यायाधीश होते. याच रामशास्त्री प्रभुणे यांनी बार्शी पेठेतील एका प्रकरणाचा निवाडा दिला होता.[२८]

अशा प्रकारे ऐतिहासिक काळापासून बार्शी हे व्यापारी उलाढालीचे महत्वाचे केंद्र होते. त्याकाळी दळणवळणाची साधने आजच्या इतकी प्रगत नव्हती. बैलाच्या पाठीवर मालाच्या गोण्या टाकून मालाची वाहतूक केली जात असे. इ. स. १८५९-६० पर्यत बार्शी तालुक्यातील वैराग हे गाव व्यापारामध्ये बार्शी शहराच्या पुढे होते. इ. स. १८५९-६० ला कुर्डूवाडीला रेल्वे लाईन आली. पुढे बार्शी-कुर्डूवाडी सडक तयार झाली. तेंव्हापासून बार्शीला खरे व्यापारी महत्व प्राप्त झाले. १९ व्या शतकाच्या अखेरीस मराठवाड्यात पिकलेल्या मालाची बाजारपेठ व मराठवाड्याला लागणाऱ्या मालाची उतारपेठ म्हणून बार्शीची सर्वत्र ख्याती झाली. याच काळात बार्शीचे व्यापारी संबंध इतर महत्वाच्या शहराशी जोडले गेले. ब्रिटिश व डच कंपन्याशी संपर्क ठेवता यावा म्हणून बार्शीचे श्री. महादप्पा शेठ कथले यांनी मुंबई व कलकत्ता या ठिकाणी त्याकाळी आपल्या पेढ्या सुरू केल्या होत्या. १९ व्या शतकाच्या अखेरीस येथील अडत बाजाराची व्याप्ती खूप वाढली.[२९]

## ➢ औद्योगिक महत्व :-

१९ व्या शतकामध्ये सोलापूर जिल्ह्याच्या औद्योगिकीकरणास सुरूवात झाली. इ. स. १९६१ अखेर सोलापूर जिल्ह्यामध्ये कापडाच्या मोठ्या ८ गिरण्या होत्या. पैकी ३ बार्शीमध्ये होत्या.[३०] बार्शी येथे मुंबई व स्थानिक व्यापारी सोडून ' रॅली ब्रदर्स ' व ' गॅड्डम बॅथेल ' या युरोपीय व्यापारी संस्था कार्यरत होत्या. तेलबिया व कापूस यांचा मोठा व्यापार येथे होत असे.[३१] सोलापूर विभागातील ' बार्शी शहर ' हे एक कापड उद्योगाचे मुख्य ठिकाण होते.[३२]

बार्शी येथील ' गुजरात ऑईल मिल ' या तेल कारखाण्यातून तेलाचे व पेंडीचे फार मोठ्या प्रमाणामध्ये उत्पादन घेतले जात होते. इ. स. १९६१ अखेर जिल्ह्यामध्ये २८० नोंदणीकृत लघु उद्योग होते. यातून ७ हजारांपेक्षा जास्त लोकांना रोजगार मिळाला होता. या लघु उद्योगामध्ये डाळ उद्योग, तेल उद्योग, विडी उद्योग, लोखंडी अवजारे बनविण्याचा उद्योग, कापड उद्योग, वाहन दुरूस्ती उद्योग यासारख्या विविध उद्योगांचा समावेश होता. बार्शी येथे हातमाग व यंत्रमाग उद्योगामुळे कपड्यांना रंग देण्याचा उद्योग मोठ्या प्रमाणावर सुरू झाला. याशिवाय येथे कापडावर छपाई करण्याचाही उद्योग मोठ्या प्रमाणावर चालत होता. जिल्ह्यातील बार्शी व सांगोला या ठिकाणी लोकरीपासून घोंगडी बनविण्याचाही व्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालत होता.[३३] इ. स. १९९१ अखेर तालुक्यातील लघु उद्योगात २३४२ तर इतर उत्पादन प्रक्रिया उद्योगामध्ये ६६२४ कामगार कार्यरत होते.[३४]

बार्शी शहर स्वस्ताईचे माहेरघर म्हणून ओळखला जाते. पूर्वीपासूनच बार्शी ही मराठवाड्याची प्रमुख बाजारपेठ होती. यामुळेच ब्रिटिशांनी बार्शीला रेल्वे सुरू केली. त्यामुळे बार्शीचे औद्योगिक महत्व खूपच वाढले. कापसाची आवक मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे बार्शीमध्ये जिनिंग व प्रेसिंगचे कारखाने सुरू झाले. यातूनच पुढे सूत गिरण्या सुरू झाल्या. पुढे आद्यौगिक वसाहत झाली. इ. स. १९८७ नंतर या औद्योगिक वसाहतीची सूत्रे आमदार दिलीप सोपल यांच्या हातात आली. त्यांच्या कौशल्यापूर्ण नेतृत्वामुळे व सहकार्यामुळे बार्शी शहराचे आद्यौगिकीकरण झपाट्याने झाले. सोपल साहेबांच्या काळातच एका औद्योगिक वसाहतीच्या तीन औद्योगिक वसाहती झाल्या. याच औद्योगिक वसाहतीत होणाऱ्या पीव्हीसी पाईपच्या उत्पादनात महाराष्ट्रामध्ये जळगावनंतर बार्शीचा क्रमांक लागतो.[३५]

## ➢ बार्शी-पाथरी पाणीपुरवठा योजना

इ. स. १८९१ मध्ये बार्शी शहराची लोकसंख्या २०,०९४ इतकी होती. शहरातील विहीरी व जय शंकर मिल समोरील तलाव यावरच हे शहर पाण्यासंदर्भात अवलंबुन होते. एखांदया वर्षी अवर्षण पडले तर लोकांचे पाण्यासाठी प्रचंड हाल होत. यातून मार्ग काढण्यासाठी बार्शी नगरपालीकेने बार्शीपासून १२ मैलावर असणाऱ्या पाथरी येथून पाणी आणण्याचे ठरविले.[३६] बार्शी नगरपालीकेने हि पाथरी - बार्शी पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी आपल्या दर वर्षीच्या अर्थसंकल्पात १० वर्षासाठी ५,००० रू तरतूद केली होती. कारण बार्शी नगरपालीकेने मागितलेल्या कर्जाला मुंबई सरकारने मान्यता दिलेली नव्हती. त्यामुळे हे पाणीपुरवठा योजनेचे काम थांबलेले होते. ही पाथरी - बार्शी पाणीपुरवठा योजना नगरपालीकेकडे हस्तांतरीत करण्याआगोदर या योजनेवर तत्कालीन मुंबई सरकारचा २१,००० रू खर्च झाला होता. यामध्ये मुख्य पाईप लाईन १४,००० रू. व बांधकाम व इतर साहित्य ७,००० रू. इतका खर्च झाला. ही पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी ०५,०३,३१० रू. खर्च अपेक्षित होता. तो पुढीलप्रमाणे.

१) सरकारी कर्ज :- ०२,३५,००० रू.
२) सरकारी अनुदान :- ०२,६१,५०० रू.
३) नगरपालीका निधी :- ०६,८१० रू.

ही योजना पूर्ण करण्यासाठी तत्कालीन कमिशनरच्या आदेशान्वये नगरपालीकेने त्यांचा प्रस्ताव सादर केला. सुधारीत आराखड्यानुसार या कामाची अंदाजे किंमत ०६,०३,८९३ रू इतकी झाली. हि रक्कम शासनाकडून मंजूर होण्यापूर्वी नगरपालीकेने सार्वजनिक बांधकाम खात्याकडून आगाऊ रक्कम न घेता स्वतःच्या तिजोरीतून खर्च करावी असे शासनाकडून बार्शी नगरपालीकेस सांगण्यात आले होते.[३७] सुरूवातीला शासनाने या कामासाठी ४,७३,०८७ रू. इतकी रक्कम मंजूर केली. या शिवाय सुलाखे मिल ते बार्शी स्पिनिंग मिल दरम्यान ४ इंची पाईपलाईन टाकण्याकरीता शासनाने १३,७७१ रू मंजूर केले होते. त्यावेळी ई.एम.डुग्गन हे सरकारी सचिव होते.[३८]

तत्कालीन मुंबई सरकारने या पाणीपुरवठा योजनेच्या कामाला १० जून १९१३ रोजी मंजुरी दिली. त्यावेळेचा या कामावरील अंदाजीत खर्च ०४,७३,००७ रू. इतका होता. यापैकी ०२,३५,००० रू सरकारने अनुदान स्वरूपात बार्शी नगरपालीकेला दिले होते. तर ०२,३५,००० रू ४ टक्के दराने २० हप्त्यामध्ये परत करण्याच्या अटीवर दिले. पुढे डिसेंबर १९१५ मध्ये या कामाची प्रत्यक्ष सुरूवात झाली. पहिल्या महायुध्दामुळे वस्तूंच्या किमती वाढल्यामुळे नियोजीत रकमेमध्ये काम पूर्ण होणे शक्य नसल्याने शासनाने ७ नोव्हेंबर १९१९ रोजी नगरपालीकेला १३,६७१ रू. वाढवून दिले. मात्र बार्शी नगरपालीकेचा ५०,००० रू मागणीचा अर्ज शासनाने नाकारला होता. याउलट अधिकच्या खर्चासाठी २५,००० रू कर्ज मागणीच्या सूचना केल्या. मात्र बार्शी नगरपालीकेच्या अस्थिर आर्थिक परिस्थितीमुळे हि सूचना सरकारने मान्य केली नाही. अधिकच्या अनुदानाद्वारे हे काम ३१ मार्च १९२१ पर्यंत चालू होते.

बार्शी नगरपालीकेने हे काम पूर्ण करण्यासाठी स्वतःच्या निधीतून २३,६९७ रू खर्च केले. १५फेब्रुवारी १९२७ ला मुख्य अभियंत्याने हे काम पूर्ण झाल्याचा व ते बार्शी नगरपालीकेकडे सुपूर्त केल्याचा अहवाल दिला. १ एप्रिल १९२१ पासून बार्शी नगरपालीकेने कर्जाची पूर्ण परतफेड होईपर्यंत वर्षाला १७,२९२ रू

एवढा हप्ता भरावा असे बार्शी नगरपालीकेला तत्कालीन कलेक्टरने सांगितले होते. १० ऑगस्ट १९२९ च्या एका पत्राअन्वये हे काम पूर्ण झाल्याचे समजते. या पाणीपुरवठा योजनेमुळे बार्शी शहराला मुबलक पाणीपुरवठा होऊन शहराच्या पाण्याचा प्रश्न सुटला.[३९]

कै. रामचंद्र मोरेश्वर ऊर्फ भाऊसाहेब साने यांनी या पाथरी-बार्शी पाणीपुरवठा योजनेच्या कामासाठी सरकारशी सातत्याने पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला. नगराध्यक्ष कै. गोविंद कृष्णाजी टिळक यांच्या काळात पाथरी तलावाचे पाणी बार्शी शहरात प्रत्यक्ष नळाने मिळण्यास सुरूवात झाली. [४०]

## ➢ बार्शी लाईट रेल्वे

ब्रिटिश सरकारने भारतात रेल्वेचे जाळे विणण्याचे निश्चित केल्यानंतर त्यांनी हे काम खाजगी कंपन्यांना दिले. यातूनच इ. स. १८४९ मध्ये " दि ग्रेट इंडियन पेनुसुला रेल्वे " या खाजगी कंपनीने भारतात रेल्वे रूळ उभारणीचे काम सुरू केले. यानंतर पुढे ११ वर्षांनी इ. स. १८६० मध्ये सोलापूर जिल्ह्यामध्ये रेल्वेचे आगमन झाले.[४१]

बार्शी लाईट रेल्वे कंपनी व निजाम सरकार यांच्या मध्ये २१ एप्रिल १९०९ रोजी झालेल्या ' लातूर एक्स्टेंशन ' करारानुसार इ. स. १९११ मध्ये मिरज-लातूर नॅरोगेज रेल्वेमार्ग सुरू करण्यात आला. पूर्वी या रेल्वेस "बार्शी लाईट रेल्वे" म्हणून ओळखले जात होते. हा रेल्वेमार्ग लातूर, बार्शी, माढा, पंढरपूर, सांगोला या तालुक्यातून सांगली जिल्हयात जातो. पुढे या नॅरोगेज मार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर झाल्यामुळे बार्शीच्या विकासाला खऱ्या अर्थाने गती मिळाली. बार्शीला व्यापारी पेठेची ख्याती मिळाली. संपूर्ण भारतातील महत्वाच्या बाजारपेठेशी बार्शी जोडली गेली. थोडक्यात या रेल्वेने बार्शीच्या शहराच्याआर्थिक विकासामध्ये अनन्यसाधारण असे योगदान दिले आहे.[४२]

## ➢ बार्शी नगरपालीका

इ. स. १९५८-५९ मध्ये सोलापूर जिल्ह्यामध्ये १४ शहरे, १० नगरपालीका होत्या. त्यापैकी अक्कलकोट तालुक्यामध्ये ३ नगरपालीका होत्या.[४३] सोलापूर जिल्ह्याचे ५ ग्रामिण विभाग होते. त्यापैकी पहिल्या विभागामध्ये बार्शी तालुक्याचा समावेश होता. तर जिल्ह्याच्या ४ शहरी विभागापैकी दुसऱ्या विभागामध्ये बार्शी शहराचा समावेश होता. इ. स. १९६१ च्या जणगणनेनुसार पंढरपूर, सांगोला, सोलापूर व कुर्डूवाडी येथील नगरपालीका १०० वर्षापेक्षा जास्त जुन्या आहेत. तर बार्शी व करमाळा येथील नगरपालीका जवळ-जवळ १०० वर्षाच्या होत्या.[४४] इ. स. १८८४ च्या गॅझेटियरनुसार तत्कालीन सोलापूर विभागामध्ये बार्शी हेच एक मोठे शहर होते. या शहरामध्ये स्वच्छ व सुंदर रस्ते होते. इ. स. १८७२ मध्ये बार्शी शहराची लोकसंख्या १५,७५९ इतकी होती. या ठिकाणाहून दररोज २५० गाडया वाहत होत्या.[४५]

इ.स १८६९ मध्ये बार्शी नगरपालीकेचे उत्पन्न २५,१७५ रू इतके होते. तर विविध सेवावरती २७,३६९ इतका खर्च करण्यात आला. उत्पन्न व खर्च या संदर्भात सोलापूर जिल्ह्यामध्ये पंढरपूर नंतर बार्शीचा क्रमांक होता.[४६] सोलापूर जिल्ह्यामध्ये बार्शी व उत्तर सोलापूर हि मोठी शहरी केंद्रे असल्यामुळे या तालुक्यांची लोकसंख्येची घनता सर्वात जास्त होती. इ. स. १९५१ मध्ये बार्शी तालुक्याची लोकसंख्येची घनता २९८ दर चौ. मैल. इतकी होती तर, इ. स. १९६१ मध्ये ३५२ दर चौ. मैल. इतकी होती.[४७]

### सोलापूर जिल्हयातील नगरपालीकांचे उत्पन्न

**(प्रमाण : आकडे हजारात)**

| नगरपालीका | १९६१-६२ | १९६४-६५ | १९७१-७२ | १९७४-७५ | १९८१-८२ | १९८४-८५ | १९९०-९१ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| बार्शी | ९,१० | १,१५६ | ३,०५१ | ४,३३४ | १०,०३३ | १७,७६० | ५१,७३१ |
| अक्कलकोट | १९१ | १७१ | ५३९ | ८०४ | ३८७० | ६८४१ | २४१५४ |
| दुधनी | ४७ | ४५ | १७६ | २११ | ५४८ | १२१० | ३२२३ |
| मैंदर्गी | ३८ | २७ | ९४ | १२८ | ६२४ | २३१५ | २०१४ |
| मंगळवेढे | १०० | १०५ | ३२९ | ५०८ | १३४२ | ३०६६ | ९१२६ |
| पंढरपूर | ५,८४ | ६,५७ | २,५४८ | ३,२०२ | १०,६३८ | १५,८३८ | ४५,०२१ |
| सांगोला | ५२ | ६९ | २७९ | २४६ | ११०५ | १७८९ | ७६५२ |
| करमाळा | १७२ | १५१ | ४५५ | ५६३ | १९०७ | २६९५ | १३४५४ |
| कुर्डूवाडी | १५३ | २४२ | ४१६ | ५९९ | १६२९ | ४५१८ | १०३४८ |

**(संदर्भ : सामाजिक आर्थिक विवेचन,सोलापूर जिल्हा)**

वरील टेबलवरून असे लक्षात येईल कि सोलापूर जिल्हयामध्ये बार्शी नगरपालीकेचे उत्पन्न सर्वाधिक होते. पंढरपूर नगरपालिकेचा अपवाद वगळता बार्शी नगरपालीकेच्या उत्पन्नाच्या जवळपासही सोलापूर जिल्हयामधील इतर कोण्त्याही नगरपालीकेचे उत्पन्न दिसत नाही. यावरून बार्शी नगरपालीकेची व पर्यायाने बार्शी शहराची आर्थिक समृध्दी लक्षात येईल.

## संदर्भ साधने


**१)** देशमुख गोपाळराव, सोलापूर जिल्ह्याची बखर, इ. स. १९८१, पृ.३.

**२)** गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, सोलापूर जिल्हा, इ. स. १८८४, पृ.२७५ ते २९०.

**३)** भारताची जणगणना, जिल्हा जणगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, इ. स. १९९१, पृ.१३, १४.

**४)** गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, सोलापूर जिल्हा, इ. स. १८८४, पृ.३०१, ३०३.

**५)** भारताची जणगणना, जिल्हा जणगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, इ. स. १९६१, पृ.३.

**६)** गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, सोलापूर जिल्हा, इ. स. १८८४, पृ.१, ३०३.

**७)** देशपांडे. सु. व., पूर्वोक्त, जून २००४

**८)** दातार आरती, महाराष्ट्रातील संतपरंपरा, पृ.७१.

**९)** देशमुख गोपाळराव, सोलापूर जिल्ह्याचा इतिहास, फेब्रुवारी २००९, पृ.५२, १६८, ५७१.

१०) देशपांडे. सु. व., श्री अंबरीष विजय, श्री भगवंत देवस्थान बार्शी, जून २००४.

११) विकिपीडीया मुक्त विश्वकोश.

१२) बार्शी नगरपालिका शतकोत्तर रोप्य महोत्सव स्मरणिका, जून १९९०.

१३) भगवंत मंदिर दिंडी नियोजन नोंद वही.

१४) देशपांडे. सु. व., श्री अंबरीष विजय, श्री भगवंत देवस्थान बार्शी, जून २००४.

१५) देशमुख गोपाळराव, पूर्वोक्त, पृ.५७३.

१६) मुळे. शा. द., इये भगवंताचिये नगरी स्मरणिका, इ. स. २००७, पृ.२४,२५,२६.

१७) सुलाखे दिनुभाऊ, अक्षरपालखी स्मरणिका, इ. स. १९८०, पृ.७४ ते १२३.

१८) वेळापूरकर मठाधिपती गुरू मुक्तेश्वर शिवाचार्य महास्वामी यांचा बायोडाटा.

१९) तत्कालिन वर्तमानपत्रे.

२०) बार्शी नगरपालिका शतकोत्तर रोप्य महोत्सव स्मरणिका, जून १९९०.

२१) स्वामी. भि. शि., सद्‌गुरूदर्शन, हिरक महोत्सव गौरव ग्रंथ, पृ.१,२,९०,९३.

२२) मुलाखत, श्रीमान. बाबासाहेब उध्दवराव मनगिरे, माजी नगराध्यक्ष बा.न.पा.

२३) बार्शी नगरपालिका शतकोत्तर रोप्य महोत्सव स्मरणिका, जून १९९०.

२४) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ.४.

२५) इंगळे. व. न., शिक्षण पंढरीचा वारकरी कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे, जुलै २००२, पृ.२५,६१

२६) मुळे. शा. द., पूर्वोक्त, इ. स. २००७, पृ.६८.

२७) गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, सोलापूर जिल्हा, सन १८८४, पृ.२६१, २६२.

२८) देशमुख गोपाळराव, पूर्वोक्त, पृ.५७१ ते ५७३.

२९) बार्शी नगरपालिका शतकोत्तर रोप्य महोत्सव स्मरणिका, जून १९९०.

३०) भारताची जणगणना, जिल्हा जणगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, इ. स. १९९१, पृ.४९.

३१) गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, सोलापूर जिल्हा, इ. स. १८८४, पृ.२६१ ते २७३.

३२) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ.९७ .

३३) भारताची जणगणना, जिल्हा जणगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, इ. स. १९६१, पृ.५०, ५१.

३४) कित्ता, इ. स. १९९१, पृ.६८.

३५) दैनिक लोकमत, २१ मे २०१३, पृ. ३.

३६) बार्शी नगरपालिका शतकोत्तर रोप्य महोत्सव स्मरणिका, जून १९९०.

३७) मुंबई पुराभिलेख, P.W.D. Filles No २६३४-I , इ. स. १९२२-२३, पृ.४३,४४, ५७.

३८) कित्ता, पृ.१३३, १३५.

३९) मुंबई पुराभिलेख, P.W.D. Filles No २६३४-II , इ. स. १९२२-२३, पृ.२४१,२४२, ३१९.

४०) बार्शी नगरपालिका शतकोत्तर रोप्य महोत्सव स्मरणिका, जून १९९०.

४१) सबकुछ सोलापूर, लोकमत मीडीया प्रा. लि. सोलापूर, फेब्रुवारी २०१४, पृ २१६.

४२) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, लातूर जिल्हा, भाग १, प्रथम आवृत्ती (मराठी) पृ.५१२.

४३) सामाजिक- आर्थिक विवेचन, सोलापूर जिल्हा, सन.१९५८-५९, पृष्ठ क्र ६१.

४४) सोलापूर जिल्हयाची जणगणना,जणगणना कार्यालय, मोहता मार्केट मुंबई, इ. स. १९६१,पृष्ठ क्र ३,७.

४५) गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी , खंड २०,सोलापूर जिल्हा,सन १८८४,पृष्ठ क्र ३५१.

४६) सोलापूर जिल्हयाची जणगणना,जणगणना कार्यालय, मोहता मार्केट मुंबई, सन १९७१, पृष्ठ क्र ३०.

४७) कित्ता, इ. स. १९६१,पृष्ठ क्र १२.